पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/३६११४८ /२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक-१४ /०९/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

सांगवी वाहतुक विभागा अंतर्गत सांगवी पीडब्ल्यु ग्राऊंडवरती श्री. रवि किसनराव यादव यांनी निर्माल सेवा ट्रस्ट संस्थेच्या वतीने दि.१५/०९/२०२३ ते २१/०९/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी १९.०० वा. चे दरम्यान श्री.शिव महापुराण कथा या सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले असुन सदर कार्यक्रमासाठी मा. व्हिव्हिआयपी तसेच लाखो भाविक खाजगी वाहनाने येणार असल्याने सदर परीसरात मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी डॉ.शिवाजी पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात वाहतूक बदल करण्यात येत आहेत.

### सांगवी वाहतूक विभाग

- जुनी सांगवी पाण्याची टाकी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) ते साई चौक नवी सांगवी दरम्यान येण्या-जाण्याचे मार्गावर अत्यावश्यक सेवेतील (उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ. व कार्यक्रमासाठी येणारी व्ही.व्ही.आय.पी वाहने ) वाहने वगळुन सर्व वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी मार्गे :- १) जुनी सांगवी पाण्याची टाकी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) कडुन बँक ऑफ महाराष्ट्र चौक ,माकन चौक जुनी सांगवी किंवा सांगवी फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील

२) साई चौक नवी सांगवी कडुन महेश्वरी चौक किंवा फेमस चौक नवी सांगवी मार्गे इच्छित स्थळी जातील

तसेच खालील नमुद मार्गावर नो पार्किंग झोन घोषीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | साई चौक नवी सांगवी ते जुनी सांगवी पाण्याची टाकी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) दरम्यान रोडचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग |
| २ | जुनी सांगवी पाण्याची टाकी (डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक) ते माकन चौक जुनी सांगवी दरम्यान रोडचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग |
| ३ | माकन चौक जुनी सांगवी ते माहेश्वरी चौक नवी सांगवी दरम्यान रोडचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग |
| ४ | माहेश्वरी चौक नवी सांगवी ते साई चौक नवी सांगवी दरम्यान रोडचे दोन्ही बाजूस | नो पार्किंग |

तरी वरील नमुद वाहतूक मार्ग व ठिकाणांवरील बदल दि.१५/०९/२०२३ ते २१/०९/२०२३ रोजी दरम्यान सकाळी १०.०० ते सायंकाळी १९.०० वाजेपावेतो अथवा वाहतुक सुरळित होईपर्यंत अत्यावश्यक सेवेतील (उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ. व कार्यक्रमासाठी येणारी व्ही. व्ही. आय. पी वाहने) वाहने वगळुन सर्व प्रकारचे वाहतुकीस लागु करण्यात येत असुन नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

Pawar 14/09

(डॉ.शिवाजी पवार)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी सांगवी वाहतुक विभाग,

Scanned with CamScanner